ePaper

…तर अजित पवार मुख्यमंत्री असते : आमदार प्रवीण पोटे



| वर्ष - 6 | अंक - 251 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- राज्यात पहाटे ५ वाजेपर्यंत 'चिअर्स'! नववर्षासाठी राज्य सरकारचा निर्णय
- भोसरीत साकारला 'इको जॉगिंग ट्रॅक'; पिंपरी-चिंचवड महापालिकेचा प्रकल्प
- 'मनसे' विचार करावा सैनिकांनो! संपादकीय पानावर...


www.mahaenews.com | रविवार, दि.२५ डिसेंबर २०२२ | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महाराष्ट्रात आता मोफत उपचार!

## सांगवीत अटल महाआरोग्य शिबीर : राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांचे संकेत

।पिंपरी ।
। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

राज्य सरकारने महाराष्ट्रातील साडेतीन कोटी महिलांचा आरोग्य डेटा तयार केला आहे. आता नर्सरी ते कॉलेजमध्ये शिकणाऱ्या १८ वर्षापर्यंतच्या मुलांचे आणि नंतर राज्यातील सर्व पुरूषांचा आरोग्य डेटा तयार केला जाणार आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर व महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर अशा प्रकारे आपल्या राज्यातील नागरिकांचे आरोग्य कार्ड तयार करणारे शिंदे-फडणवीस हे पहिले सरकार आहे. केवळ आरोग्य डेटा गोळा करून हे सरकार थांबणार नाही, तर राज्यातील प्रत्येक नागरिकाला मोफत आरोग्य तपासण्या व उपचार उपलब्ध करून देणार असल्याचे राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी शनिवारी (दि. २४) सांगितले.

महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच प्रतिभा महिला प्रतिष्ठान, चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने नवी सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानात आयोजित दोन दिवसीय अटल महाआरोग्य शिबीराचे राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी नारायणपूरचे नारायण महाराज, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, उपमहापौर नानी घुले, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, एकनाथ पवार, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रतिभा महिला प्रतिष्ठानच्या संस्थापिका अश्विनी जगताप, शिबीराचे आयोजक व भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, पुण्याचे सहधर्मादाय आयुक्त डॉ. सुधीरकुमार बुक्के, उपआरोग्य संचालक डॉ. राधाकृष्ण



पवार, कॅम्प नियोजक डॉ. धर्मेंद्र कुमार, औंध ऊरो रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ली आदी उपस्थित होते.

डॉ. तानाजीराव सावंत म्हणाले, "शिंदे-फडणवीस सरकारने माता सुरक्षित, तर घर सुरक्षित या उपक्रमांतर्गत दोन महिन्यांत महाराष्ट्रातील १८ वर्षांवरील साडेतीन कोटी महिलांच्या आरोग्याचा पूर्ण डेटा तयार केला आहे. हा एक टप्पा झाला आहे. आता त्या महिलांना सर्व उपचार मोफत देण्याचा उपक्रम राबवला जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात नर्सरीतील बालकांपासून ते कॉलेजमध्ये शिकणाऱ्या १८ वर्षांपर्यंतच्या मुलांपर्यंत सर्वांची आरोग्य तपासणी करून त्यांच्याही आरोग्याचा डाटा तयार केला जाणार आहे. हे झाल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व पुरूषांची आरोग्य तपासणी करून त्यांचाही डाटा सरकार तयार करेल. भारताच्या स्वातंत्र्यानंतर, महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पहिल्यांदाच संपूर्ण महाराष्ट्राचे आरोग्य कार्ड तयार करणारे हे पहिले सरकार आहे. सरकार आपल्या राज्यातील नागरिकांचे आरोग्य कार्ड तयार करण्यापुरतेच सीमीत न राहता शरीर हे मंदिर आहे आणि आत्मा हे परमेश्वर आहे हे समजून प्रत्येकाला मोफत आरोग्य तपासणी आणि उपचार उपलब्ध करून देणार आहे.

### तळागाळातील लोकांपर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवण्याचा संकल्प : शंकर जगताप

भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप म्हणाले, "आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या संकल्पनेतून या महाआरोग्य शिबीराची सुरूवात झाली. या शिबीराच्या आयोजनाचे हे पाचवे वर्ष आहे. गोरगरीब व तळागाळातील नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी या शिबीराचे दरवर्षी आयोजन केले जाते. पण कोरोना संकटामुळे त्यात दोन वर्षांचा खंड पडला. २०१९ मध्ये या महाआरोग्य शिबीरात तब्बल २ लाख नागरिकांची तपासणी करण्यात आली होती. ३१ हजार रुग्णांना प्रत्यक्ष उपचार दिले होते. पावणे दोनशे रुग्णांची अँजिओप्लास्टी मोफत करून दिली गेली. गोरगरीब रुग्णांना विविध आजारांतून बरे करण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करतो. दिव्यांगांसाठी वर्षातून दोनवेळा शिबीर घेऊन जयफूर फूट व इतर उपकरणांचे मोफत वाटप केले जाते.

# लेखकांनी प्रखर भूमिका मांडावी : लक्ष्मीकांत देशमुख

## इंद्रायणी साहित्य संम्मेलन : मान्यवरांची उपस्थिती

।पिंपरी ।

। महाईन्यूज । ।प्रतिनिधी।

समाजाला साहित्याची, प्रबोधनाची, मार्गदर्शनाची, दिशादर्शकाची गरज आहे. त्यामुळे साहित्यिकांनी, लेखकांनी लिहिले पाहिजे. ज्या लेखनात साहित्यात समाज हित सामावलेले असते तेच खरे साहित्य होय आणि आज त्याचीच खरी गरज आहे. लेखक हा संवेदनशील असला पाहिजे. समाजाच्या संवेदना भावभावना त्याच्या लेखणीतून व्यक्त झाल्या पाहिजेत. लेखकाने एखाद्या प्रश्नावर "भूमिका" घेतली पाहिजे, ही परंपरा श्री संत ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरु तुकाराम महाराजांपासून सुरू आहे, परंतु आज ही परंपरा पाळली जात नाही असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी मोशी येथे व्यक्त केले.

इंद्रायणी साहित्य परिषद आणि मोशी ग्रामस्थ यांच्या वतीने आयोजित केलेल्या पहिल्या इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी लक्ष्मीकांत देशमुख बोलत होते. मोशी येथील यशवंतराव चव्हाण साहित्य नगरी, रवींद्रनाथ टागोर विचारपीठावर यावेळी संमेलनाचे अध्यक्ष कामगार नेते व माजी नगरसेवक अरुण बोऱ्हाडे, स्वागत अध्यक्ष संतोष बारणे, विश्वकर्मा पब्लिकेशनचे विशाल सोनी, हभप बाळासाहेब महाराज काशीद, कार्यकारीनी मंडळाचे अध्यक्ष संदीप तापकीर, देहु देवस्थानचे मोरे महाराज आदी उपस्थित होते.

स्वागताध्यक्ष संतोष बारणे यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा. दिगंबर ढोकले यांनी केले. आभार कार्यकारणी



मंडळाचे कार्यध्यक्ष सोपान खुडे यांनी मानले. या संमेलनाच्या आयोजनामध्ये मोशी ग्रामस्थांसह इंद्रायणी साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सीमा काळभोर, विकास कंद, सचिव रामभाऊ सासवडे, सहसचिव डॉ. ए. ए. मुलानी, कोषाध्यक्ष अलंकार हिंगे, सदस्य दादाभाऊ गावडे, श्रीहरी तापकीर, सुनील जाधव यांनी सहभाग घेतला होता.

### अध्यक्ष अरुण बोऱ्हाडे म्हणाले की...

यावेळी अध्यक्ष भाषनात अरुण बोऱ्हाडे यांनी सांगितले की, श्री संत ज्ञानेश्वर माऊली, जगद्गुरु संत तुकाराम महाराज, नागेश्वर महाराज, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पवित्र इंद्रायणी नदीच्या तीरावर वसलेल्या मोशी गावात इंद्रायणी साहित्य परिषदेचे पहिले इंद्रायणी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. शेतकरी, कष्टकरी कामगार यांच्या त्यागातून आणि कष्टातून या पंचक्रोशीचे आज स्मार्ट सिटी आणि मेट्रो सिटी म्हणून जागतिक पातळीवर नाव झाले आहे. जागतिकीकरणाच्या या परिस्थितीत देखील मोशी गाव आणि ग्रामस्थ अजूनही आपले गावपण, वारकरी सांप्रदायाची परंपरा आणि सामाजिक भान टिकवून आहेत. शहराला मिळालेला हा नावलौकिक म्हणजे येथील शेतकऱ्यांनी, कामगारांनी समर्पण भावनेने केलेल्या त्यागाची फलनिष्पत्ती आहे. मी माझ्या मनातील भाव, भाषा भोवतालचे चित्रीकरण "भाव,भाषा आणि भवताल" यामध्ये शब्द रूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# राज्यात पहाटे 5 वाजेपर्यंत 'चिअर्स'!

## नाताळ, नववर्ष स्वागतानिमित्त मद्यालये पहाटे पाच वाजेपर्यंत खुली

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नाताळ आणि नववर्षानिमित्त राज्य शासनाच्या आदेशानुसार पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित जिल्ह्यातील मद्यालये (रेस्टो-बार) पहाटे पाच वाजेपर्यंत खुली ठेवण्यात येणार आहेत. तर, वाइन, बिअर आणि देशी मद्या विक्री दुकाने रात्री साडेदहाऐवजी रात्री एक वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास मुभा देण्यात आली आहे. नाताळ आणि नववर्ष स्वागतानिमित्त पुण्यात बनावट मद्यविक्री, वाहतूक आणि उत्पादन रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाची खास २४ पथके तैनात असणार आहेत.**



नाताळ आणि नववर्षानिमित्त २४, २५ आणि ३१ डिसेंबर रोजी मद्यालये पहाटे पाच वाजेपर्यंत खुली ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित जिल्ह्यातील मद्यालये पहाटे पाच वाजेपर्यंत खुली ठेवण्यात येणार आहेत. तसेच वाइन, बिअर आणि देशी मद्यविक्री दुकाने रात्री साडेदहाऐवजी रात्री एक वाजेपर्यंत खुली राहणार आहेत. याबाबत बोलताना राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे अधीक्षक सी. बी. राजपूत म्हणाले, 'राज्य शासनाच्या निर्णयाची पुण्यातही अंमलबजावणी केली जाणार आहे. मात्र, या काळात पुण्यात बनावट मद्यविक्री, वाहतूक आणि उत्पादन होऊ नये, म्हणून विभागाची नेहमीची १४ आणि खास दहा अशी एकूण २४ पथके कार्यरत असणार आहेत. या पथकांत प्रत्येकी दोन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या पथकांवर दोन उपअधीक्षक लक्ष ठेवणार असून या दोन उपअधीक्षकांकडून अधीक्षकांना वेळोवेळी माहिती दिली जाणार आहे.'

### पुण्यात मद्यप्रेमींसाठी आंनदाची बातमी !

**राज्य शासनाच्या आदेशानुसार नाताळ आणि नववर्षानिमित्तपुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित जिल्ह्यातील मद्यालये (रेस्टो-बार) पहाटे पाच वाजेपर्यंत खुली ठेवण्यात येणार असून वाइन, बिअर आणि देशी मद्यविक्रीची दुकाने रात्री साडेदहा ऐवजी रात्री एक वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास मुभा देण्यात आली असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे अधीक्षक सी. बी. राजपूत यांनी दिली. राजपूत पुढे म्हणाले की, राज्य शासनाच्या निर्णयाची पुण्यातही अंमलबजावणी केली जाणार आहे. मात्र, या काळात पुण्यात बनावट मद्यविक्री, वाहतूक आणि उत्पादन होऊ नये, म्हणून विभागाची नेहमीची १४ आणि खास दहा अशी एकूण २४ पथके कार्यरत असणार आहेत. या पथकांत प्रत्येकी दोन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या पथकांवर दोन उपअधीक्षक लक्ष ठेवणार असून या दोन उपअधीक्षकांकडून अधीक्षकांना वेळोवेळी माहिती दिली जाणार आहे.**

दरम्यान, नाताळ आणि नववर्षानिमित्त २४, २५ आणि ३१ डिसेंबर रोजी मद्यालये पहाटे पाच वाजेपर्यंत खुली ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित जिल्ह्यातील मद्यालये पहाटे पाच वाजेपर्यंत खुली ठेवण्यात येणार आहेत.

# पुणेकर : गारेगार... लालेलाल

## नाताळात स्ट्रॉबेरीची भुरळ! स्ट्रॉबेरीच्या मागणीत वाढ

### सातारा जिल्ह्यातील वाई, भिलार, महाबळेश्वर भागातून चार ते पाच टन स्ट्रॉबेरीची आवक

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

नाताळ सणानिमित्त अहमदाबाद, बंगळुरु, दिल्ली, गोवा येथून लालचुटूक स्ट्रॉबेरीला मागणी वाढली आहे. मागणी वाढल्याने स्ट्रॉबेरीच्या दरातही वाढ झाली आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत स्ट्रॉबेरीच्या पाऊण किलोच्या एका प्लास्टिक ट्रेच्या दरात २० ते ३० रुपयांनी वाढ झाली आहे. एका ट्रे मध्ये प्लास्टिकची आठ छोटी खोकी (पनेट) असतात. एका पनेटमध्ये साधारणपणे २०० ग्रॅम स्ट्रॉबेरीची फळे असतात. एका प्लास्टिक ट्रे चे दर प्रतवारीनुसार २०० ते ३५० रुपये दरम्यान आहेत. गेल्या आठवड्यात एका ट्रेचा दर प्रतवारीनुसार १५० ते ३०० रुपये दरम्यान होता, अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील स्ट्रॉबेरी व्यापारी सुभाष राऊत यांनी दिली. मार्केट यार्डातील फळबाजारात सातारा जिल्ह्यातील वाई, भिलार, महाबळेश्वर भागातून चार ते पाच टन स्ट्रॉबेरीची आवक होत आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत बाजारात स्ट्रॉबेरीच आवक कमी झाली आहे. आवक कमी झाल्याने दर वाढले आहे. गेल्या काही वर्षापासून नाशिक भागातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर स्ट्रॉबेरीची लागवड करण्यास सुरुवात केली आहे. नाशिक भागातून स्ट्रॉबेरीची आवक होत असल्याचे राऊत यांनी सांगितले. यंदा स्ट्रॉबेरीची लागवड चांगली झाली होती.



### नाताळात स्ट्रॉबेरीला देशभरातून मागणी

**नाताळात स्ट्रॉबेरीला देशभरात वाढली आहे. अहमदाबाद, दिल्ली, बंगळुरु, हैदराबाद या शहरातून स्ट्रॉबेरीला मागणी वाढली आहे. महाबळेश्वर, वाई भागातील शेतकरी स्ट्रॉबेरी परराज्यात विक्रीस पाठवित आहेत. नाशिकमधील स्ट्रॉबेरी बाजारात गेल्या काही वर्षांपासून नाशिकमधील शेतकऱ्यांनी स्ट्रॉबेरी लागवड करण्यास सुरुवात केली आहे. नाशिकमधील स्ट्रॉबेरी लागवड यशस्वी झाली आहे. सातारा भागातील स्ट्रॉबेरीप्रमाणे नाशिकमधील स्ट्रॉबेरीची प्रतवारी चांगली आहे.**

### वैकुंठ स्मशानभूमीत अघोरी कृत्य;

# दोन तृतीयपंथीय अटकेत

। पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

वैकुंठ स्मशानभूमीत मध्यरात्री अघोरी कृत्य करणाऱ्या दोन तृतीयपंथीयांना विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. या प्रकरणी लक्ष्मी निंबाजी शिंदे (वय ३१, रा. अंधेरी, मुंबई), मनोज अशोक धुमाळ (वय २२, रा. कोथरुड) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत वैकुंठ स्मशानभूमीतील सुरक्षारक्षकाने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी दोघांच्या विरोधात जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिंदे आणि धुमाळ तृतीयपंथीय आहेत. गुरुवारी मध्यरात्री दोघे जण दुचाकीवरुन स्मशानभूमीत आले. अंत्यविधी चौकशीसाठी दोघे जण आल्याची शक्यता वैकुंठ स्मशानभूमतील सुरक्षारक्षकास वाटले. दोघे जळणाऱ्या चितेजवळ अघोरी कृत्य करत होते. सुरक्षारक्षकाच्या लक्षात हा प्रकार आला. त्याने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. चितेजवळ काळ्या रंगाच्या बाहुल्या, अर्धवट जळालेली छायाचित्रे, लिंबू, सुई, हळद-कुंकू आढळून आले, असे विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील माने यांनी सांगितले. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दादासाहेब गायकवाड तपास करत आहेत.



# भोसरीत साकारला 'इको जॉगिंग ट्रॅक'

## महापालिका प्रशासनाचा रोल मॉडेल प्रकल्प : कामगार, नागरिकांची सुविधा



पिंपरी । । महाईन्यूज ।
सुनिल आढाव

**पुणे-नाशिक महामार्गावर वाहतुकीच्या वर्दळ नेहमीच पहायला मिळते. मात्र, याच मार्गालगत मोकळ्या जागेत पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने 'इको जॉगिंग ट्रॅक' विकसित केला आहे. त्यामुळे कामगार, नागरिकांची सुविधा झाली असून, या प्रकल्पाबाबत सर्वसामान्यांमधून प्रशासनाचे कौतूक करण्यात येत आहे.**

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाख इतकी आहे. नागरिकांना मोकळा श्वास घेता यावा. नियमित व्यायाम करता यावा. पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेबाबत जागृती करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध उपक्रम हाती घेतले जात आहेत. 'स्मार्ट सिटी'च्या दिशेने यशस्वी वाटचाल करणाऱ्या पिंपरी-चिंचवडमधील सामान्य नागरिकांना चांगली जीवनशैली देण्यासाठी महापालिका प्रशासनाने आता शहरात ठिकठिकाणी 'इको जॉगिंग ट्रॅक' विकसित केले आहेत.


पुणे-नाशिक महामार्गालगत सीआयआयटी कार्यालयापासून ते लांडेवाडी येथील स्वागत कमानीपर्यंत सुमारे २ हजार मीटर लांबीचा इको जॉगिंग ट्रॅक विकसित करण्यात आला असून, त्याचे काम पूर्ण झाले आहे. विशेष म्हणजे, महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने दर्जेदार काम केले असून, सर्वसामान्य कामगार वर्गातून या प्रकल्पाचे स्वागत करण्यात येत आहे.

### नागरिकांच्या आरोग्यासाठी हितकारक...

धावपळीच्या युगात सर्वसामान्य नागरिकांना नियमित व्यायाम आणि सुविधा उपलब्ध होण्याची आवश्यकता आहे. स्वच्छ सर्व्हेक्षणात महापालिका प्रशासनाने सहभाग घेतला आहे. पूर्वी याच ट्रॅकच्या जागेत बांधकाम राडारोडा आणि कचरा फेकला जात होता. त्यामुळे शहराचे एकप्रकारे विद्रुपिकरण चव्हाट्यावर येत होते. यामुळे महापालिका प्रशासनाने रस्त्याच्या बाजुला असलेल्या मोकळ्या जागेत इको जॉगिंग ट्रॅकचे काम हाती घेतले. या ट्रॅकवर नियमित चालणे उच्च रक्तदाब आणि हृदयविकारासाठी आरोग्यदायी आहे, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.







"नाशिक फाट्यापासून भोसरीकडे जाताना या भागामध्ये मोकळ्या जागेत पूर्वी नियमबाह्यपणे राडारोडा आणि कचरा टाकला जात होता. महापालिका प्रशासनाने 'इको जॉगिंग ट्रॅक' विकसित केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना चांगली सुविधा मिळाली आणि जागेचा सदुपयोगही झाला. सामान्य नागरिकांसाठी प्रशासनाने घेतलेला हा प्रकल्प निश्चितच स्वागतार्ह आहे.

**- अभिषेक तगडे,** नागरिक, भोसरी.



'इको जॉगिंग ट्रॅक'चे काम अत्यंत दर्जेदार झाले आहे. प्रशासनाने अत्यंत चांगला प्रकल्प हाती घेतला होता. या भागात पूर्वी प्रचंड अस्वच्छता होती. प्रशासनाने या भागातील एकही झाड हटवलेले नाही. या ठिकाणी महावितरणचे काही पोल ठेवले होते. ते महावितरण प्रशासनाने काढून घेतले. मोकळ्या जागेचा चांगला उपयोग करुन सामान्य नागरिकांसाठी दर्जेदार सुविधा झाली आहे.

**- सतीश केदार,** स. अभियंता, महावितरण, दापोडी.



'सीआयआयटी' ते लांडेवाडी येथील स्वागत कमान भागत पूर्वी खूप अस्वच्छता दिसत होती. या भागात औद्योगिक कंपन्या आणि शासकीय कार्यालये आहेत. त्यामुळे कर्मचारी, कामगारांची वर्दळ असते. भोसरी पोलीस ठाणेही या ठिकाणी असल्यामुळे नागरीक येथे ये-जा करतात. या भागाचे सुशोभिकरण झाले आणि चांगले काम केले आहे.

**-सोमनाथ पठाडे,** स. अभियंता, महावितरण, कासारवाडी.

छायाचित्र संकलन : प्राजक्ता जावलीकर.

## संपादकीय »

# ‘मनसे’ विचार करावा सैनिकांनो!

***आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे चांगलेच सक्रिय झाले आहेत. या घडामोडी सुरु असताना पुण्यात मनसे पक्षातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. हे पाहता राज ठाकरे यांनी कठोर भूमिका घेत कार्यकर्त्यांना शेवटची ताकीद दिली आहे. सोशल मीडियावर अथवा माध्यमांवर बोललं तर हकालपट्टी अटळ असल्याची तंबी राज ठाकरेंनी दिली आहे.***

*पक्षांतील अंतर्गत बाबी सोशल मीडिया अथवा माध्यमांशी बोलल्या तर कारवाई करण्याचा इशाराच राज ठाकरेंनी दिला आहे. यानंतर हा इशारा वसंत मोरेंनाच उद्देशून असल्याची चर्चा पुण्यात रंगू लागल्या आहेत.*

*हे पत्र काढल्यानंतर आता वसंत मोरेंची आणखी एक पोस्ट चर्चेत आहेत. ‘राजकारणाचं काय खरं नाही, हे लोकं निवडणुका कधी घेतील माहिती नाय बाबा... जरा उद्योग व्यवसायाकडे लक्ष केंद्रित करतो’ अशा आशयाची फेसबुक पोस्ट वसंत मोरेंनी केली आहे. त्यामुळे आता मोरेंच्या या पोस्ट वरून राजकीय चर्चेला उधाण आले आहे.*

*मागील काही दिवसांपासून पुण्यातील मनसेच्या नेत्यांमध्ये असलेले अनेक अंतर्गत वाद चव्हाट्यावर आले आहेत. अनेकांनी त्यांचं मत उघडपणे स्पष्ट केलं नसलं तरीही कार्यकर्त्यांमध्ये खदखद बघायला मिळत आहे. त्यातच आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने नीलेश माझिरे यांची कामगार आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदावरून हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर त्यांनी मनसेचा राजीनामा दिला. त्यांच्यासोबतच त्यांच्या तब्बल 400 सदस्यांनीदेखील मनसेचा राजीनामा दिला आहे.*

*नीलेश माझिरे हे पुण्यातील डॅशिंग नेते वसंत मोरे यांचे खंदे समर्थक मानले जातात. त्या दोघांनी पुण्यात मनसेचं मागील अनेक वर्ष काम केलं. पक्षबांधणीत या दोघांचाही मोठा वाटा आहे. काही दिवसांपूर्वी राज ठाकरे यांच्या उपस्थितीत पक्षनोंदणीला सुरुवात करण्यात आली होती. त्यावेळी मावळ आणि पुण्यातील इतर ग्रामीण भागातील सदस्यांची नोंदणी करुन घेण्यात दोघांचाही महत्वाचा वाटा होता. मात्र वसंत मोरे आणि राज ठाकरे यांच्यात काही दिवसांपासून अंतर्गत वाद सुरु असल्याचं चित्र आहे. शिवाय वसंत मोरेही पक्षाच्या काही निर्णयावर नाराज असल्याच्या चर्चा आहे. असे असले तरी मनसे हा युवकांचा आणि आक्रमक कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. या पक्षाकडे सध्यस्थितीला महाराष्ट्रातील सर्वात प्रभावी नेता आहे. मनसैनिकांनी ‘मनसे’विचार केल्यास राजकीय भविष्य उज्वल आहे.*




## आनंदी सकाळ

### नाम रूपाला व्यापून शिल्लक उरते

गोंदवलेकर महाराज म्हणतात की, समजा मी तुम्हाला प्रश्न विचारला की, ‘आनंद म्हणजे काय?’ तर एखाद्या आनंदी मुलाकडे बोट दाखवून तुम्ही म्हणाल की, ‘हे पहा, इथे आनंद आहे!’ इतकेच नव्हे तर याप्रमाणे आनंदाने खेळणारी मांजराची पिले, उड्या मारणारी लहान वासरे, हसणारे स्त्री-पुरुष, फुलांनी बहरलेल्या लता, यांच्याकडे बोट दाखवून,‘इथे आनंद आहे’ असे तुम्ही सांगाल, पण हे काही माझ्या प्रश्नाचे खरे उत्तर नव्हे. ‘आनंदी वस्तू कोणत्या आहेत, असा माझा प्रश्न नसून ‘आनंद मला दाखवा असे मी विचारले होते. आनंदी वस्तूमध्ये आनंद राहतो, म्हणून वस्तू हा काही आनंद नव्हे.लहान मूल हेच जर आनंद असेल तर मोठे स्त्री-पुरुष आणि मांजरीची पिले आनंदयुक्त असणार नाहीत. अर्थात् आनंद हा एकच असला पाहिजे; कारण सर्व ठिकाणी आढळणाऱ्या आनंदाला एकच शब्द आपण वापरतो. आपण जो जो माणूस पाहतो, तो तो निराळा असतो, तरी सर्वांना आपण माणसेच म्हणतो, कारण प्रत्येक माणसामध्ये ‘मनुष्यपणा’ आहे.

# नो टेन्शन!..करा डिक्सशन



भूमिका

तुम्हाला टेन्शन कशामुळे आले आहे, त्याचा शोध घ्या. काही वेळा ठोस कारण नसतानाही टेन्शन येतं. एखाद्याचा स्वभाव आणि त्या परिस्थितीकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन यावर ते खरंच टेन्शन घेण्यासारखे आहे का, हे अवलंबून असते. अगदी शुल्लक कारणं असतात, पण तरीही ठरावीक वेळेत ठरावीक गोष्टी पूर्ण केल्या, तर विद्यार्थीदशेत येणारे टेन्शन बऱ्याच प्रमाणात कमी होईल. एखादा विषय अवघड वाटत असेल तर चर्चा करून त्या समस्येचं उत्तर शोधा. ज्या गोष्टी चर्चेने सोडवणे शक्य आहे, त्या वेळीच सोडवा. उगीच त्या गोष्टीचा बाऊ करत बसू नका.

छोट्या मोठ्या कोणत्याही गोष्टीच आपल्याला टेन्शन येतं. विद्यार्थी असताना परीक्षेचे, अभ्यासाचे टेन्शन तर जीवनातील आर्थिक अडचणी, प्रकृती अस्वास्थ्य, जॉब इत्यादी अशा एक ना अनेक बाबींचे टेन्शन असतात, पण टेन्शन घेतल्याने या समस्या टळणार नसतात, परंतु तरीही टेन्शन घेतले जाते. मग त्यातून नैराश्य, चिडचिडेपणा वाढतो. त्यातच विद्यार्थ्यांच्या जीवनात परीक्षा हा एक अविभाज्य भाग आहे. परीक्षेत मिळणाऱ्या मार्कांवरून त्या विद्यार्थ्यांच्या यशाचे मोजमाप केले जाते. त्यातूनच मग परीक्षेत लिहू शकू की नाही, प्रश्न कोणते असतील, मी जो अभ्यास केलाय ते येईल की नाही, चांगले मार्क्स मिळतील की नाही याचे टेन्शन विद्यार्थी घेतात. सहाजिकच मग या टेन्शनचा प्रभाव हा आपोआप मार्कांवर पडत असतो.

एका संशोधनानुसार मानवी मेंदूमध्ये एका मिनिटात तब्बल ६० हजार विचार येत असतात. म्हणजेच मेंदू हा एखाद्या अतिप्रगत मशीनपेक्षाही गुंतागुंतीचा आहे. त्यामुळे आपल्या मनात एकाच वेळी अनेक विचार घोळत असल्यानेच टेन्शन येते. अर्थातच मग त्याचे दुष्परिणाम आपल्या शारीरिक आणि मानसिकतेवर होत असतात. वागण्यात, बोलण्यात, अभ्यासात त्याचे प्रतिबिंब उमटत असते. मग या टेन्शनला आपण टाळू शकतो का? होय नक्कीच हे शक्य आहे. तुम्हाला




एखाद्या गोष्टीचे टेन्शन आले असेल, तर तुम्ही त्याबाबत एखाद्या व्यक्तीसोबत बोला. मग ते मित्र, मैत्रीण, नातेवाईक, शिक्षक कोणीही असेल. बोलून एकदाच मोकळे व्हा, मात्र त्याच गोष्टीचे टेन्शन घेऊन बसू नका. असे केल्याने तुमच्या टेन्शनकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन नक्कीच बदलेल. टेन्शनमुळे एकटेपणा किंवा अपराधीपणाची भावना बळावते. त्यापेक्षा मित्रांमध्ये मिसळण्याचा प्रयत्न करा, बोलते व्हा. त्यामुळे तुमचे टेन्शन थोडे हलके होईल.

तुम्हाला टेन्शन कशामुळे आले आहे, त्याचा शोध घ्या. काही वेळा ठोस कारण नसतानाही टेन्शन येतं. एखाद्याचा स्वभाव आणि त्या परिस्थितीकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन यावर ते खरंच टेन्शन घेण्यासारखे आहे का, हे अवलंबून असते. अगदी शुल्लक कारणं असतात, पण तरीही ठराविक वेळेत ठराविक गोष्टी पूर्ण केल्या, तर विद्यार्थीदशेत येणारे टेन्शन बऱ्याच प्रमाणात कमी होईल. एखादा विषय अवघड वाटत असेल तर चर्चा करून त्या समस्येचं उत्तर शोधा.

# अवयवदान जनजागृतीची पदयात्रा...

**अवयवदान प्रबोधनाच्या कार्यासाठी अनेक कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती निर्माण होऊन ते मोठ्या संख्येने सहभागी झाले पाहिजेत. आता याचसाठी कार्य करायचे आहे. त्यासाठी या विषयाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.**

या विषयाचे प्रबोधक व कार्यकर्ते निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी विविध स्थानिक स्तरांवरील संस्थांमार्फत प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करून या क्षेत्रातील कार्यकर्त्यांची संख्या आणि ज्ञान याची वृद्धी करणे आवश्यक आहे. आम्ही फेडरेशन ऑफ ऑर्गन अॅण्ड बॉडी डोनेशन या संस्थेतर्फे व केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील रोटो-सोटोच्या सहकार्याने विविध प्रशिक्षण कार्यक्रम व या विषयावरील प्रबोधनपर साहित्य प्रकाशित करणे असे उपक्रम आयोजित करीत आहोत. अवयवदानाच्या क्षेत्रात कार्य करायचे ठरवल्यानंतर मी माझ्या परीने अभ्यास करून व्याख्याने व स्थानिक कार्यक्रम यामधून लोकांपुढे जाऊन हा नवीन विषय त्यांच्यापुढे मांडण्याचा प्रयत्न करत होतो, परंतु नंतर लक्षात आले की या बाबतीत जनजागृती करायची असेल तर स्थानिक स्तरावरील तोटके



प्रयत्न उपयोगाचे नाहीत. या विषयाला मोठ्या जनजागृतीची आवश्यकता आहे. जास्तीत जास्त लोकांपर्यंत हा विषय पोहोचवणे आवश्यक आहे. त्यामुळे पदयात्रा या संकल्पनेचा उगम माझ्या मनात झाला. त्यादृष्टीने मी प्रयत्न सुरू केले. फेडरेशन ऑफ ऑर्गन अॅण्ड बॉडी डोनेशन या संस्थेत सहभागी होऊन या आमच्या संस्थेमार्फत आजपर्यंत एकूण चार पदयात्रा यशस्वीरित्या पूर्ण केल्या.

या चार पदयात्रांमधून एकूण ३६०० किलोमीटर अंतर पायी चालत जाऊन एकूण ५० हजार लोकांपर्यंत हा विषय पोहोचवू शकलो. महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व जिल्हे पायाखालून घातले. या सर्वांचा अनुभव मिश्र स्वरूपाचा असला तरी एकूण अनुभव उत्साहजनक होता हे नक्की. त्यामुळे माझ्या मनाप्रमाणे काही करू शकलो याचं समाधान आहेच, पण आता सत्तरी पार केली आहे. हळूहळू डोळे आणि कान सहकार्य करण्यासाठी कुरकुरत आहेत. प्रकृती चांगली असली तरी पदयात्रेचा मार्ग कितपत चालू ठेवता येईल याबाबत साशंक आहे. तरीही कार्य चालूच राहील. राहणार आहे आणि राहिले पाहिजे, पण हे प्रयत्न खूपच तोटके आहेत आणि अत्यंत तुटपुंजे आहेत याची नम्र जाणीव मला या पदयात्रांनी नक्कीच करून दिली आहे.

अवयवदान प्रबोधनाच्या कार्यासाठी अनेक कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।  
या मज सोडवा लवकरी ॥१॥  
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।  
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥  
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज औरंगाबाद-सोलापूर दौऱ्यावर

। औरंगाबाद । महाईन्यूज ।

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्या रविवारी औरंगाबाद दौऱ्यावर येणार आहेत. शहरातील छावणी परिसरात शहर स्वच्छता जनजागृती मोहिमेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हजेरी लावणार आहे. त्यानंतर ते सोलापूरसाठी शासकीय विमानाने रवाना होणार आहे.



त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून तयारी करण्यात आली आहे. तर यासाठी पोलिसांचा विशेष बंदोबस्त देखील असणार आहे.

## राजकीय कार्यक्रम नाहीच...

**एकनाथ शिंदे यांचा उद्याच्या औरंगाबाद दौऱ्यात फक्त स्वच्छता जनजागृती मोहिमेचं एकमेव कार्यक्रम असणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांच्या दौऱ्यात एकही राजकीय कार्यक्रम नसणार आहे. मात्र यावेळी काही राजकीय भेटीगाठी होऊ शकतात. तर औरंगाबाद दौऱ्यानंतर मुख्यमंत्री शिंदे सोलापूरला रवाना होणार आहे.**

## असा असणार दौरा...

- 25 डिसेंबर (रविवार) रोजी सकाळी 10 वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुंबई येथून शासकीय विमानाने (VT-VDD) चिकलठाणा, औरंगाबाद विमानतळाकडे प्रयाण करतील.
- सकाळी 10.45 वाजता चिकलठाणा औरंगाबाद विमानतळ येथे आगमन व मोटारीने छावणी परिषद मैदान, औरंगाबादकडे प्रयाण.
- सकाळी 11 वाजता डॉ.श्री. नानासाहेब धर्मधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या सौजन्याने छावणी परिषद मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या शहर स्वच्छता जनजागृती मोहिमेत उपस्थित राहतील.
- दुपारी 12 वाजता छावणी परिषद मैदान, औरंगाबाद येथून मोटारीने औरंगाबाद विमानतळाकडे प्रयाण.
- दुपारी 12.15 वाजता औरंगाबाद विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने (VT-VDD) सोलापूर विमानतळाकडे प्रयाण.
- दुपारी 01:00 वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व हॅलिकॉप्टरने शेवगांव-भाळवणी, ता. करमाळा सोलापूर विमानतळाकडे प्रयाण
- दुपारी 01:30 वाजता आदीनाथ सहकारी साखर कारखाना लि.शेदगांव-भाळवणी, ता. करमाळा, जि. सोलापूर हेलिपॅड येथे आगमन
- 01:30 वाजता आदीनाथ सहकारी साखर कारखाना लि., शेदगांव-भाळवणी, ता. करमाळा या कारखान्याचा 27 वा ऊस गळीत हंगाम शुभारंभ
- दुपारी 02:30 वाजता शेगांव-भाळवणी, ता. करमाळा येथून हॅलिकॉप्टरने सोलापूर विमानतळाकडे प्रयाण
- दुपारी 02:45 वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने (VT-VDD) नागपूरकडे प्रयाण
- 03:45 वाजता नागपूर विमानतळ येथे आगमन व मोटारीने रामगिरी निवासस्थान, नागपूरकडे प्रयाण
- दुपारी 04:00 वाजता रामगिरी निवासस्थान, नागपूर येथे आगमन व राखीव

# मुंबईत गोवरचा प्रादुर्भाव थांबेनाच; सहा नव्या रुग्णांची नोंद

### एकूण बाधितांचा आकडा 512 वर

। मुंबई । महाईन्यूज ।

कोरोनाचं संकट ) पुन्हा घोंगावत असतानाच मुंबईत आधीपासूनच प्रादुर्भाव असलेली गोवरची साथ अद्याप आटोक्यात आलेली नाही. मुंबईतील गोवरचा प्रादुर्भाव अद्याप थांबण्याचं नाव घेईना. शुक्रवारी (23 डिसेंबर) पुन्हा गोवरचे सहा नवे रुग्ण आढळून आले. त्यामुळे गोवरची लागण झालेल्या एकूण रुग्णांची संख्या आता 512 झाली आहे. गोवरच्या प्रादुर्भावाच्या सुरुवातीला 9 बालकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मुंबईत गोवरमुळे अद्याप एकही मृत्यू झालेला नाही. मुंबई महापालिकेच्या एका अधिकाऱ्यानं दिलेल्या माहितीनुसार, शहरात पाच संशयित मृत्यूही झाले आहेत, पण हे मृत्यू गोवरामुळे झाले की अन्य काही कारणांमुळे हे अद्याप निश्चित झालेले नाही.

मुंबई महापालिकेकडून (BMC) देण्यात आलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी दिवसभरात 27 मुलांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

## गोवर लसीकरण वेगानं सुरू

**9 महिने ते 5 वर्ष वयोगटातील 2,60,739 मुलांपैकी 73,609 बालकांना गोवर-रुबेला विशेष लसीचा अतिरिक्त डोस 78 आरोग्य केंद्रांवर देण्यात आला असल्याचं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. आणि 6 ते 9 महिने वयोगटातील 5,293 मुलांपैकी, जिथे 9 महिन्यांखालील गोवर रुग्णांची संख्या 10 टक्क्यांपेक्षा जास्त आहेत, त्या 1,849 बालकांना एमआर लसीचा 'शून्य डोस' देण्यात आला.**



# वीसपेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद नाही: शिक्षणमंत्री

। नागपूर महाईन्यूज ।

वीसपेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याबाबत निर्णय झालेला नाही, असे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी स्पष्ट केले.

आमदार अमित देशमुख यांनी यासंदर्भात अधिवेशनात लक्षवेधी मांडली होती. शाळांबाबत शासनाचे तसे धोरण नसेल तर शिक्षणमंत्र्यांनी तसे ठामपणे जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी केली. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून आजवरच्या सरकारांनी खेडोपाडी दुर्गम भागात शाळा सुरू केल्या आहेत.

सर्व शिक्षा अभियान राबविले जात आहे. असे असताना कमी पटसंख्या असल्याचे कारण



देत इगतपुरी तालुक्यातील दरेवाडी येथील ४३ विद्यार्थी संख्या असलेली शाळा बंद केली असल्याच्या बाबीकडे देशमुख यांनी शासनाचे लक्ष वेधले होते. वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेली कुठलीही शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाकडून झाला नाही, असे उत्तर केसरकर यांनी दिले. शासनाचा तसा निर्णय झाला नसेल तर दरेवाडी येथील शाळा बंद का केली असा सवाल आमदार देशमुख यांनी उपस्थित केला.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोटाळ्यावर देवेंद्र फडणवीसांकडून सारवासारव : राऊत

। नागपूर । महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील भूखंड घोटाळ्याचे आरोप गंभीर आहेत. त्यामुळे आम्ही केंद्रातील प्रमुख लोकांना कागदपत्रे पाठवली आहेत. योग्य ठिकाणी कागदपत्रे गेली आहेत, अशी माहिती ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दिल्याने एकच खळबळ उडाली आहे.

दरम्यान शिंदे यांच्या घोटाळ्यावर देवेंद्र फडणवीस सारवासारव करत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. राजधानी दिल्लीत त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी संजय राऊत यांनी भाजपवर आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे ) यांच्यावरही निशाणा साधला.

नागपुरातील भूखंड घोटाळ्यावरुन महाराष्ट्रातील विरोधी



पक्षाने हिवाळी अधिवेशन दणाणून सोडलं. विरोधकांनी या प्रकरणी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरच आरोप करुन त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. एकीकडे शिंदेंना अडचणीत आणण्याचा प्रयत्न सुरु असतानाच ठाकरे गटाने दिल्लीतही शिंदे यांच्याविरोधात हालचाली सुरु केल्या आहेत.

केंद्र सरकार आणि तपास यंत्रणांकडेच एकनाथ शिंदे यांच्या घोटाळ्याची कागदपत्रे दिल्याचं संजय राऊत यांनी सांगितलं.

## 'देवेंद्र फडणवीस घाईघाईने दिल्लीत आले'

मुख्यमंत्र्यांवरील आरोप गंभीर आहेत. देवेंद्र फडणवीस घाईघाईने दिल्लीत आले आहेत. ते कशाला आले माहित नाही? पण नक्कीच त्यांची त्याविषयी चर्चा झाली असावी. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 110 कोटींचे भूखंड आपल्या मर्जीतील बिल्डरांना 2 कोटी रुपयांना दिले. जे 16 भूखंड गरिबांच्या घरांसाठी राखीव होते. त्यावर काही निष्कर्ष काढण्यात आले होते. तेव्हा भूखंड वाटपाला विरोध झाला होता. तरीही तेव्हाच्या नगरविकास मंत्र्यांनी आणि आताच्या मुख्यमंत्र्यांनी घाईघाईने भूखंड वाटप केलं होतं. त्यावर कोर्टाने ताशेरे ओढले आहेत. आता भलेही न्यायालयाचं समाधान झालं असेल फक्त 24 तासात, तरीही तो भ्रष्टचार आहे, असं संजय राऊत म्हणाले.

## अण्णा हजारे गप्प का?

राज्यात एवढा मोठा भूखंड घोटाळा झाला तरीही अण्णा हजारे या विषयावर गप्प का आहेत? असा प्रश्न मी नाही तर समाजमाध्यमातून विचारला जात आहे. सरकारने बोहणीचा भ्रष्टाचार केला. 110 कोटींचं नुकसान झालं, 16 भूखंड बिल्डरांच्या घशात गेले तरी त्यावर कोणी काहीच बोलत नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सारवासारव करतात. ही मोदींच्या विचारधारेची फसवणूक आहे, अशी खोचक टीकाही त्यांनी केली.

## शॉर्ट न्यूज

### केंद्र सरकारचा मोठा निर्णय; मोफत रेशन योजनेला दिली मुदतवाढ

।नवी दिल्ली।



केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मंत्रिमंडळाने आता मोफत रेशन योजनेला एक वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे. यासोबत वन रँक वन पेन्शनमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यापूर्वी 20600 पेन्शनधारकांना लाभ मिळत होता. आता सुधारणा केल्यानंतर 25 लाख पेन्शनधारक झाले आहेत. त्यामुळे 8500 कोटींचा बोजा पडणार आहे.

यापूर्वी सप्टेंबरमध्ये सरकारने पीएमजीकेवायची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत तीन महिन्यांनी वाढवली होती. कोरोनाव्हायरसचा प्रसार रोखण्याच्या उद्देशाने देशव्यापी लॉकडाऊनमुळे गरिबांना खाण्यासाठी मदत म्हणून एप्रिल 2020 मध्ये PMGKAY लाँच करण्यात आली. या योजनेअंतर्गत 80 कोटी गरीब लोकांना दरमहा पाच किलो गहू आणि तांदूळ मोफत दिले जातात होते.

# वीटभट्टीवर मोठा स्फोट! 7 जण ठार

## 20 हून अधिक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले : बिहारमधील दुर्दैवी घटना

पीएमएनआरएफ प्रत्येक मृतांच्या कुटुंबीयांना 2 लाखांची मदत जखमींना 50 हजार रुपये देण्यात येईल

पाटना ।महाईन्यूज। वृत्तसंस्था।

बिहारमधील मोतिहारीमध्ये मोठा स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. रामगढवा येथील नरिलगिरी येथील वीटभट्टी चिमणीत स्फोट झाला असून या स्फोटात 7 जणांचा मृत्यू झाला आहे. तर ढिगाऱ्याखाली दोन डझनहून अधिक लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुर्घटनेतील १६ जखमींवर रक्सौलमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर आजूबाजूच्या लोकांमध्ये गोंधळ उडाल्याचं पाहायला मिळालं. मदत आणि बचावकार्य सुरू आहे. घटनास्थळी स्थानिक पोलीस आणि अधिकाऱ्यांचे पथक दाखल झालं आहे. जखमींची प्रकृतीही अत्यंत गंभीर आहे.

वीटभट्टीवर स्फोटाचा आवाज दूरवर ऐकू आला, असं आसपासच्या लोकांनी सांगितं. या अपघातानंतर एसडीआरएफची टीम घटनास्थळी पोहोचली आणि त्यांनी बचावकार्य सुरू केलं, असं बिहार पोलीस मुख्यालयाकडून सांगण्यात आलं आहे. ठार झालेल्यांमध्ये 4 स्थानिक आणि 3 जण उत्तर प्रदेशचे रहिवासी होते. पोलीस सहकार्य करत असून आवश्यक ती मदत करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर दु:ख व्यक्त केलं आहे. पंतप्रधानांनी ट्विटरवर केलेल्या ट्विटमध्ये लिहिले की, "मोतिहारी येथील वीटभट्टीवर झालेल्या अपघातात झालेल्या जीवितहानीमुळे व्यथित झालो आहे. पीएमएनआरएफ प्रत्येक मृतांच्या कुटुंबीयांना 2 लाखांची मदत जखमींना ५० हजार रुपये देण्यात येईल,असही मोदींनी ट्विटमध्ये म्हटलं आहे.



रामगढवा येथील नरिलगिरी येथील वीटभट्टी चिमणीत स्फोट झाला असून या स्फोटात 7 जणांचा मृत्यू झाला आहे. तर ढिगाऱ्याखाली दोन डझनहून अधिक लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुर्घटनेतील १६ जखमींवर रक्सौलमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर आजूबाजूच्या लोकांमध्ये गोंधळ उडाल्याचं पाहायला मिळालं. मदत आणि बचावकार्य सुरू आहे. घटनास्थळी स्थानिक पोलीस आणि अधिकाऱ्यांचे पथक दाखल झालं आहे. जखमींची प्रकृतीही अत्यंत गंभीर आहे. वीटभट्टीवर स्फोटाचा आवाज दूरवर ऐकू आला, असं आसपासच्या लोकांनी सांगितं. या अपघातानंतर एसडीआरएफची टीम घटनास्थळी पोहोचली आणि त्यांनी बचावकार्य सुरू केलं, असं बिहार पोलीस मुख्यालयाकडून सांगण्यात आलं आहे. ठार झालेल्यांमध्ये 4 स्थानिक आणि 3 जण उत्तर प्रदेशचे रहिवासी होते. पोलीस सहकार्य करत असून आवश्यक ती मदत करत आहेत.

# "द्वेषाच्या बाजारात प्रेमाचं दुकान उघडायला आलोय : राहुल गांधी

।नवी दिल्ली ।महाईन्यूज। वृत्तसंस्था।

देशावर कोविडचे सावट असताना केंद्र सरकारशी झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची भारत जोडो यात्रा दिल्लीत दाखल झाली आहे. या यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी भाजपवर जोरदार टीका केली. चीनमध्ये कोरोनाव्हायरस प्रकरणांमध्ये वाढ झाल्याने काँग्रेस आणि भाजप एकमेकांवर टीका करत आहेत. हेही वाचा: Winter Session: अजित पवारांचे पुणेरी चिमटे, मंत्री उदय सामंत यांना जवळ बोलावत म्हणाले...

राहुल गांधी म्हणाले की, द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान उघडायला आलो आहोत. तुम्ही देखील प्रेमाचा छोटसं दुकान सुरू करा. निवडून आलेले लोकच द्वेष पसरवत आहेत. शेतकरी हातात हात घालून चालत आहेत. आम्ही ३ हजार किमीहून अधिक चाललो आहोत. या प्रवासात कोणालाही त्याची जात किंवा धर्म विचारला गेला नाही, असंही राहुल यांनी म्हटलं.




दरम्यान यात्रेत फक्त प्रेम आणि आदर आहे, बेरोजगारी आणि महागाईविरोधात आमचा प्रवास आहे, असंही ते म्हणाले. आमचा प्रवास द्वेषाच्या विरोधात आहे. आम्ही एका भारतीयाला आणि दुसऱ्या भारतीयाला आलिंगन देतो. माझ्या चेहऱ्याकडे पाहून असं वाटतं का ? मी ३००० किलोमीटर चाललोय. पण मी थकलो नाही, तुम्ही मला शक्ती दिली, असंही राहुल यांनी सांगितलं.

## अपघातात 8 जणांचा मृत्यू : केरळमधील घटना

# भाविकांवर काळाचा घाला

। चेन्नई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

थेनी-अंदिपेत्ती येथील दहा भाविक अय्यपा स्वामी देवाच्या दर्शनाला सबरीमाला मंदिरात गेले होते. तेथून ते शुक्रवारी परतत होते. रात्री ११ च्या सुमारास त्यांच्या वाहनाला अपघात झाला. व्हॅन ४० फुट दरीत कोसळली. त्यामुळे आठजणांचा जागीच मृत्यू झाला. तर दोघेजण गंभीर जखमी झाले. गंभीर जखमींमध्ये एका लहान मुलाचा समावेश आहे. पत्तनमिटः सबरीमाला मंदिरातून देव दर्शन करुन परत असताना एका व्हॅनला केरळ-तामिळनाडू सीमेवर अपघात झाला. अपघातात आठ भाविकांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत.

थेनी-अंदिपेत्ती येथील दहा भाविक अय्यपा स्वामी देवाच्या दर्शनाला सबरीमाला मंदिरात गेले होते. तेथून ते शुक्रवारी परतत होते. रात्री ११ च्या सुमारास त्यांच्या वाहनाला अपघात झाला. व्हॅन ४० फुट दरीत कोसळली. त्यामुळे आठजणांचा जागीच मृत्यू झाला. तर दोघेजण गंभीर जखमी झाले. गंभीर जखमींमध्ये एका लहान मुलाचा समावेश आहे.

केरळ-तामिळनाडू सीमेवर कुमली-कुमबम रस्त्यावर हा अपघात झाला. येथेच केरळला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी आहे. चालक वेगाने वाहन चालवत होता. वेगातच त्याने गाडी वळवली. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे व्हॅन थेट दरीत कोसळली. पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. दरीत कोसळलेली गाडी दरीतून काढण्यात आली आहे. भाविकांचे मृतदेह व जखमींना रुग्णालयात हलवण्यात आले आहे. पोलीस घटनेचा तपास करत आहेत.

सबरीमाला मंदीर भारतातले प्रसिद्ध देवस्थान आहे. दरदिवशी सुमारे एक लाख भाविक येथे दर्शनासाठी येतात. सतत येथे भाविकांची गर्दी असते. अपघात झालेले भाविक येथे दर्शनासाठी गेले होते. भाविकांचे अपघाती निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. हळहळ व्यक्त केली जात आहे.

केंद्रीय मंत्री व्ही. मुरलीधरन यांनी या घटनेबाबत शोक व्यक्त केला आहे. अपघातात मृत्यू ओढावलेल्या भाविकांच्या आत्म्यास शांती लाभो. जखमी लवकरात लवकर बरे व्होवोत, असे ट्विट केंद्रीय मंत्री मुरलीधरन यांनी केले आहे. अशा प्रकारे होणारे अपघात टाळण्यासाठी वेगावर नियंत्रण आणण्याची मागणी होत आहे. केंद्र सरकारने काही वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणले आहे. वाहन तयार करतानाच त्याचा वेग नियंत्रित केला जातो. अशाप्रकारे सर्वच वाहनांचा वेग नियंत्रित करावा, अशी मागणी होत आहे. ईलेक्ट्रीक वाहनांचा वेग आधीच नियंत्रित करण्यात आला आहे.

# अन् अनिल कपूरची पत्नी एकटीच हनीमूनला...

बॉलीवूडचा 'मिस्टर इंडिया' म्हणजेच सुपरस्टार अनिल कपूरची गणना चित्रपटसृष्टीतील सर्वात एव्हरग्रीन अभिनेत्यांमध्ये केली जाते. तो मनोरंजन विश्वातील सर्वात आघाडीचे अन् फिट फिटनेस फ्रिक म्हटलं जातं. अनिल कपूर आज त्याचा 66 वा वाढदिवस साजरा करत आहेत. अनिल कपूरचा जन्म 24 डिसेंबर 1965 रोजी झाला. अनिल कपूरने बॉलिवूड इंडस्ट्रीला अनेक ब्लॉकबस्टर सिनेमे दिले आहेत, पण त्याच्यासाठी इथपर्यंत पोहोचणं सोपं नव्हतं. हे स्थान मिळवण्यासाठी अनिलने जीवनात अनेक अडचणींचा सामना केला. मात्र जितका रंजक त्याच्या संघर्ष होता. तितकीचं त्यांची लव्ह लाईफही मजेदारचं होती. अनिल आणि त्यांची पत्नी सुनिताची ओळख कशी झाली, सुरुवातीच्या काळ ते कौटुंबिक जीवनातील अनेक अडचणींचा खुलासा त्यांनी केला. तर झालं असं की एका मित्रानं सुनितासोबत प्रँक कॉल करण्यासाठी मूद्दाम अनिल कपूरचा नंबर दिला होता. सुनिताने फोन केला तेव्हा अनिलने फोन उचलला आणि तेव्हा ते सुनिताचा आवाज ऐकून तिच्या प्रेमात पडले. त्यानंतर त्यांचे बोलणे वाढू लागले. या कॉलनंतर दोघेही एका पार्टीत भेटले, जिथे दोघे पहिल्यांदा समोरासमोर आले. यानंतर हळूहळू दोघांचे बोलणे वाढले, त्यांची मैत्री झाली आणि या मैत्रीचे रुपांतर प्रेमात कधी झाले ते कळलेच नाही. अनिल कपूर आणि सुनीता कपूर यांना यावेळी समजले होते की ते एकमेकांशिवाय राहू शकत नाहीत.



# गौतमीची लावणी होणार बंद? '

गौतमी पाटील आता मनोरंजन विश्वातील सर्वाधिक लोकप्रिय सेलिब्रेटी झाली आहे. खासकरुन मराठी मनोरंजन जगतात तर तिला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. ज्याठिकाणी गौतमीचा कार्यक्रम असेल तिथे हमखास गर्दी होतेच. सांगली जिल्ह्यातील एका गावामध्ये गौतमीच्या लावणीचा कार्यक्रम झाला होता. यावेळी प्रेक्षकांची गर्दी एवढी होती की, जिथे कार्यक्रम होता तिथे असलेली जिल्हा परिषदेची शाळा पडली होती. गौतमीची लावणी अश्लील आहे असे म्हणत तिचे कार्यक्रम होऊ न देण्याची भूमिका अनेकांनी घेतल्याचे दिसून आले आहे. आता तर एका वेगळ्याच कारणासाठी गौतमी चर्चेत आली आहे. त्याचं झालं असं की माडा तालुक्यातील पिंपळफुटा गावात गौतमीचा कार्यक्रम आय़ोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर गर्दी होती. आता गौतमीच्या लावणीवर कायमस्वरुपी बंदी घालण्यात यावी. अशी मागणी मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून आले आहे. यासगळ्यात गौतमीची प्रतिक्रियाही समोर आली आहे.

काहीही झालं तरी लावणी बंद होणार नाही. खासकरुन ग्रामीण भागातील लोकांचे माझ्यावर प्रेम आहे. मला माहिती आहे की, लोकांना माझे कार्यक्रम आवडतात. त्याची लोकप्रियता वाढते आहे. काही चुका झाल्या असतील.



# जीवाची होतीया काहिली मालिकेत ट्विस्ट! अर्जुन आणि रेवती बनले सँटाक्लॉज..

सोनी मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या 'जिवाची होतिया काहिली' या प्रेमकहाणीला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळते आहे. मराठी भाषिक आणि कानडी भाषिक यांच्यातल्या प्रेमाची कहाणी छोट्या पडद्यावर दिसते आहे. या आठवड्यात या मालिकेत एक ट्विस्ट येणार आहे. नाताळच्या निमित्ताने हा खास भाग चित्रित करण्यात आला आहे. यावेळी आलेल्या संकटातून बाहेर पाडण्यासाठी मालिकेतून नायक आणि नायिका म्हणजेच अर्जुन आणि रेवथी सांताक्लॉजच्या लुक मध्ये समोर येणार आहे. या मालिकेत प्रमुख नायकाच्या भूमिकेत कोल्हापूरचा रांगडा गडी, अभिनेता राज हंचनाळे प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस पडतोय. तसेच प्रतीक्षा शिवलकर हिचा कानडी अंदाजसुद्धा प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस पडतोय. मालिका आता वेगळ्या वळणावर पोचली आहे. अर्जुन आणि रेवथी यांच्यात मैत्री झाली आहे आणि या मैत्रीचं रूपांतर प्रेमात होताना पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.

सध्या अर्जुनच्या वाढदिवसानिमित्त रेवथीची धावपळ सुरू आहे. तिला अर्जुनसाठी विशेष असा काही सरप्राईझ बेत अखायचा आहे. नुकतीच त्यांनी मॉलमध्ये जाऊन खरेदी केली आहे. दोघांचे वेगळे बाह्यरूप पाहायला मिळते आहे. पण या गोंधळात नेमके अप्पा पाहतील म्हणून सँन्टा क्लॉजचे कपडे घालून ते आप्पांसमोर जातात. हे पाहणं फार मजेशीर ठरणार आहे. त्यांचं हे बाह्यरूप फारच वेगळं दिसतंय.



# प्रेमात पडलेल्या अभिनय बेर्डेचे लागणार बांबू.. हा भन्नाट टीझर पाहाच..

**प्रेमाचा इतिहास काय सांगतो, खांद्यासाठी बांबू लागतो आणि बांबू लागला तर कोणाचा तरी खांदा लागतोच. हीच ओळ अधोरेखित करणारा विशाल सखाराम देवरूखकर दिग्दर्शित 'बांबू' या भन्नाट सिनेमाचे टीझर सोशल मीडियावर सध्या धुमाकूळ घालत आहे.**

अभिनय बेर्डे, शिवाजी साटम, अतुल काळे, वैष्णवी कल्याणकर, पार्थ भालेराव, स्नेहल शिदम, समीर चौघुले यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाची निर्मिती क्रिएटिव्ह वाईब प्रॉडक्शनची असून तेजस्विनी पंडित, संतोष खेर निर्माते आहेत. तर 'बांबू'चे लेखन अंबर हडप यांनी केले आहे. टीझरमध्ये अभिनयच्या खांद्यावर अनेक मुली येऊन रडत आहेत. डोळे, नाक, कान पुसत आहेत. मात्र त्याच्या आयुष्यात अजून कोणीच मुलगी आलेली दिसत नाही. आता त्याच्या आयुष्यात कोणी मुलगी येणार की, त्याचेही 'बांबू' लागणार. हे २६ जानेवारीला कळणार आहे. या टीझरमध्ये सर्वात लक्षवेधी ठरत आहेत, त्या टीझरच्या शेवटी असलेल्या संस्कृत ओळी. आता याचा नेमका अर्थ काय, हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. 'बांबू'ची खासियत म्हणजे यात अभिनय बेर्डे नेहमीपेक्षा वेगळ्या लूकमध्ये दिसत आहे. अभिनयचा हा नवीन अंदाज प्रेक्षकांना नक्कीच आवडेल.

दिग्दर्शक विशाल सखाराम देवरूखकर म्हणतात, " हा विषय तरूणाईला भुरळ घालणारा आहे. या वयात प्रत्येकाच्या आयुष्यात वेगवेगळ्या कारणांनी बांबू हे लागतातच. त्यामुळे 'बांबू'ची कथा कुठेतरी प्रेक्षकांना आपली कथा वाटेल. जुन्या दिवसांची, प्रेमाची आठवण करून देणारा 'बांबू' आहे."



## शॉर्ट न्यूज »

### घरी बसल्या बसल्या जय शहाला मिळाली 'मेस्सीची जर्सी'

।नवी दिल्ली। महाईन्यूज



फिफा विश्वचषक 2022 मध्ये अर्जेंटिनाला चॅम्पियन बनवण्यात मोलाची भूमिका बजावणारा कर्णधार लिओनेल मेस्सीचा जगभरात मोठा चाहतावर्ग आहे. भारतातही त्यांची लोकप्रियता खूप आहे. काही प्रसिद्ध सेलिब्रिटीही या करिष्माई खेळाडूचे चाहते आहेत. या सेलिब्रिटींमध्ये बीसीसीआयचे सचिव जय शह यांचेही नाव आहे. नुकतेच अर्जेंटिनाच्या कर्णधाराने जय शहला एक खास भेट दिली आहे, या भेटवस्तूचा फोटो आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य आणि माजी खेळाडू प्रज्ञान ओझाने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे.

# पिवळी जर्सी, धोनीची साथ आणि चेन्नईचे प्रेम..!

### महाराष्ट्राचा 'हा' मराठमोळा खेळाडू चेन्नई सुपर किंग्सच्या ताफ्यात दाखल

। कोची ।

आयपीएल २०२३ हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव कोचीमध्ये काल संपन्न झाला. आयपीएल २०२३ हंगामासाठी होत असलेल्या या लिलावात टीम इंडियाचा एक खेळाडू आयपीएल करिअर संपण्यापासून वाचला आहे. या खेळाडूला अत्यंत स्वस्त दरात खरेदी करण्यात आले, ज्याची कोणालाही अपेक्षा नव्हती. आयपीएल २०२३ हंगामासाठी हा लिलाव सुरू होण्यापूर्वी, या खेळाडूची आयपीएल कारकीर्द संपेल आणि कोणताही संघ त्याला किंमतही देणार नाही, असे मानले जात होते, परंतु असे काहीही झाले नाही.



चेन्नई सुपर किंग्जने अजिंक्य रहाणेला त्याच्या मूळ किमतीत विकत घेतले आहे. गेल्या मोसमात संघाची कामगिरी चांगली नव्हती, अशा स्थितीत रहाणे संघाच्या मधल्या फळीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. आयपीएल २०२३ लिलावात (IPL 2023 AUCTION) चेन्नई व्यतिरिक्त कोणत्याही संघाने त्याच्यावर बोली लावली नाही. रहाणेने नुकतेच हैदराबादविरुद्ध द्विशतक झळकावले आणि सांगितले की तो वेगवान फलंदाजीही करू शकतो. चेन्नईने आपल्या संघात खरेदी केल्यानंतर अजिंक्य रहाणेने पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. अजिंक्य रहाणे म्हणाला की, सर्व चेन्नईच्या चाहत्यांना माझा नमस्कार... चेन्नईच्या परिवारात सामील होताना मला खूप आनंद होत आहे. मी चेन्नईच्या संघात आणि चेपॉक मैदानात खेळण्यास खूप उत्सुक आहे.

## आयपीएल लिलावात काव्या मारन पुन्हा एकदा आली चर्चेत आली

### सोशल मीडियावर 'या' कारणांवरून होतेय ट्रोल

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



आयपीएल २०२३ च्या लिलावात सर्वाधिक पैसे घेऊन उतरलेल्या सनरायझर्स हैदराबादने आपला पैसा प्रचंड खर्च केला आहे. टीम सीईओ काव्या मारन हिने लिलावाच्या सुरुवातीला वारेमाप पैसे खर्च करण्यापासून स्वतःला रोखले नाही. मात्र, जे खेळाडू हैदराबादने विकत घेतले तेवढे पैसे खर्च करून बहुतेकांना ते पसंत पडले नाहीत आणि त्यामुळेच काव्याला ट्विटरवर खूप ट्रोल केले जात आहे.

सनरायजर्स हैदराबादची सीईओ काव्या मारन लिलावाच्या सुरुवातीपासूनच खूप चर्चेत होती. तिचे फोटो हे नेहमीच सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. मात्र काल ती वेगळ्याच कारणाने आता ट्रोल झाली. तिने लिलावात सुरुवातीपासून बक्कळ पैसा खर्च केला. सर्वात आधी म्हणजे सुरुवातीच्या फेरीमध्येच तिने इंग्लंडचा युवा खेळाडू हॅरी ब्रुक याच्यासाठी तब्बल १३.२५ कोटी खर्च केले. या खरेदीनंतर ती आनंदी दिसली, ज्यानंतर तिने केलेल्या या बेभान खर्चावर नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केलं.

हैदराबादने हॅरी ब्रूकच्या रूपाने लिलावात सर्वात महागडी खरेदी केली. ब्रूकला खरेदी करणे हैदराबादसाठी थोडे अवघड झाले आहे कारण त्यांनी ब्रूकसाठी १३ कोटींहून अधिक खर्च केले आहेत, परंतु त्याला मधल्या फळीत बसवण्यासाठी विद्यमान खेळाडूंपैकी एकाला स्थान द्यावे लागेल.

# 'सीएसके'साठी नव्या भूमिकेत दिसणार सुरेश रैना!

### लिलावात होणार सहभागी

कतार ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

इंडियन प्रीमियर लीग (IPL) च्या 16 व्या हंगामासाठी (IPL 2023) शुक्रवारी (23 डिसेंबर) कोची येथे लिलाव होणार आहे. लिलावाचे डिजिटल टेलिकास्ट जिओ सिनेमा (JIOCINEMA) वर होणार असून याच्या एक दिवस आधी JIOCINEMA ने मॉक ऑक्शन आयोजित केले. त्यात अनेक दिग्गज खेळाडूंची खरेदी करताना दिसून आले. मिस्टर आयपीएल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुरेश रैनाने (SURESH RAINA) देखील लिलावात चेन्नई सुपर किंग्जला (CSK) पाठिंबा दिला असून तो खेळाडूनंतर सीएसकेसाठी एका वेगळ्या भूमिकेत दिसला.

मॉक ऑक्शनमध्ये रैना सीएसकेला दर्शवणारा पिवळा टी-शर्ट घालून आला होता आणि



याद्वारे त्याने आपण चेन्नईच्या दिशेने राहणार असल्याचे दाखवले होते. या लिलावात रैनाने इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू सॅम करनला चेन्नईत आणण्यासाठी खूप प्रयत्न केले आणि खेळाडूला तब्बल 19.5 कोटी रुपयांना करारबद्ध केले. रैनाने मॉक ऑक्शनमध्ये जे काही केले त्यातून दिसून येतं की खऱ्या लिलावातही चेन्नई करनला मिळविण्यासाठी सर्व प्रयत्न करू शकते.

रैनाने यावर्षी आयपीएलला (IPL) अलविदा म्हटले आहे जेणेकरून तो इतर टी-20 लीगमध्ये खेळू शकेल. गेल्या आयपीएलमध्ये (IPL 2022) रैनाला कोणत्याही संघाने विकत घेतले नव्हते आणि त्यानंतर त्याला हा निर्णय घ्यावा लागला. निवृत्तीची घोषणा केल्यानंतर रैनाने रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजमध्ये भाग घेतला. यानंतर तो अबू धाबी टी10 लीगमध्येही सहभागी झाला आहे. काही परदेशी टी-20 लीगमध्येही तो खेळताना दिसतो.

### चेन्नईकडे किती पर्स व्हॅल्यू?

**चेन्नई संघाने ख्रिस जॉर्डन आणि ॲडम मिल्नेसारखे खेळाडू सोडले आहेत. आता टीमकडे एकूण 20.45 कोटी रुपयांची पर्स शिल्लक आहे. त्याच वेळी, संघाकडे एकूण 2 परदेशी खेळाडूंचे स्लॉट शिल्लक आहेत.**

# आयपीएल लिलावामुळे सख्या भावांच्या घरात इकडे आनंद दुसरीकडे दुःख

। आयपीएल ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

आयपीएल लिलाव 2023 अनेक खेळाडूंसाठी संस्मरणीय ठरला आहे. यावेळी पंजाब किंग्ज संघाने आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठी बोली लावून चाहत्यांना आश्चर्यचकित केले, तर अनेक दिग्गज खेळाडू या लिलावात न विकले गेले. पण या लिलावाने घरासाठी सुखासोबतच दुःखही आले आहे याचे कारण म्हणजे एका भावाने करोडोंची कमाई करून आयपीएलच्या इतिहासात आपले नाव कोरले तर दुसरा अपयशी राहिला.

पंजाब किंग्जने इंग्लंडचा स्टार अष्टपैलू खेळाडू सॅम करनला विकत घेण्यासाठी 18.5 कोटी रुपये खर्च केले आहेत, ही आयपीएलच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात मोठी बोली आहे. यापूर्वी लिलावात क्रिस मॉरिस (16.25 कोटी) सर्वात महाग विकला गेला होता. या लिलावानंतर सॅम करन देखील खूप आनंदी दिसत होते, परंतु सॅम करनचा भाऊ टॉम करन या लिलावात अनसोल्ड राहिला.




टॉम करन सॅम करनपेक्षा वयाने मोठा आहे. तो या लिलावात 75 लाखांच्या मूळ किंमतीसह उतरला होता, परंतु या लिलावात कोणताही संघाने त्याच्यावर रुची दाखवली नाही. टॉम करन आतापर्यंत 3 आयपीएल सीझनचा भाग आहे. त्याने त्याच्या आयपीएल कारकिर्दीत एकूण 13 सामने खेळले आहेत, ज्यात त्याच्या 13 बळी आहेत. तो राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली संघाचा भाग आहे.

सॅम करनने 2019 मध्ये पंजाब किंग्जकडून आयपीएल पदार्पण केले. मात्र, संघाने त्याला सोडून दिले. 2020 च्या लिलावात त्याला महेंद्रसिंग धोनीच्या कर्णधार संघ चेन्नई सुपर किंग्सने 5.5 कोटींमध्ये विकत घेतले, तो दोन वर्षे या संघाचा भाग राहिला. त्याचवेळी दुखापतीमुळे तो गेल्या हंगामात खेळू शकला नव्हता. सॅमने 32 सामन्यात 337 धावा करण्यासोबतच आयपीएलमध्ये 32 विकेट्स घेतल्या आहेत. 2022 च्या टी-20 विश्वचषक स्पर्धेचा तो सामनावीर देखील होता.